# आई

कु. निवेदिता नागसेन चव्हाण

‘‘स्वामी तिन्ही जगाचा

आईविना भिकारीं’’

‘आई’ या शब्दात अमृताची गोडी आहे. ‘आ’ म्हणजे ‘आत्मा’ ‘ई’ म्हणये ‘ईश्वर’. आई या शब्दाचा अर्थ ‘आत्मारूपी ईश्वर’ असा होतो. एखादा मनुष्य कितीही श्रीमंत असला तरी त्याच्या संपत्तीला आईविना काहीच किंमत नसते. आपल्याला पूज्य असणाऱ्या देवतांचे ही श्रेष्ठ दैवत आईच आहे.

आईचं प्रेम म्हणजे प्रेमाचा अथांग सागर आहे. सागरात असलेल्या पाण्याचे प्रेमही अमर्याद असते. कोणीतरी म्हटले आहे की, ‘आईचे प्रेम इतके अमर्याद आहे की ते लिहिण्यासाठी सागरातील पाण्याएवढी शाई आणि आकाशाएवढा कागद देखील कमी पडेल.’ आईच्या प्रेमाच्या सागरात संपूर्ण विश्वातील प्रेम समावलेले असते. आई ही एक अशी ज्योत आहे की जी स्वतः जळते परंतु ती आपल्या प्रकाशात सर्व कुटुंबाला सामावून घेते. आई ही घराचा एक आधारस्तंभच आहे, जी आपल्या घराला आधार देते. आईच्या प्रेमाला अंत नाही. आईची माया ही नेहमी मुलांसाठी झळकत असते. आई ही एक असा आत्मा की जिच्यामध्ये तेज आहे. कधीच न मिटणारे आणि सतत तेजोमय राहणारे असे आईचे प्रेम आहे. आईला नेहमी सूर्यासारखे झळकत राहणेच माहित असते. मावळणे तिला माहितच नसते. ज्याप्रमाणे काट्यावर गुलाब उमलते, त्याचप्रमाणे ती आपल्या मुलाचे भविष्य उमलताना पाहते. म्हणूनच फकिरराव शिंदे म्हणतात -


‘‘आई खरचं काय असते?

लेकराची माय असते,

वासराची गाय असते.

दुधाची साय असते,

लंगड्याचा पाय असते.’’



‘गुलाबाचे काटे तसे आईचे धपाटे’ या सुविचाराप्रमाणे मुलांना आईचा मार हा ही तिच्या प्रेमाचाच भाग आहे. जो कोणी या देवासमान आईचा अपमान करेल, त्याला देवाच्या दारात प्रवेश मिळणार नाही. आईचे उपकार कोणी कधीच फेडु शकत नाही. म्हणूनच ‘थोर तुझे उपकार आई, थोर तुझे उपकार!’

***

